**प्रेस नोट दि.२८/०३/२०१९**

**विश्रांतवाडी पोलीस स्टेशन, पुणे**

**बँकांचे ए.टी.एम फोडणा-या इसमास पकडणारे सतर्क पोलीस मार्शल यांना मा.पोलीस आयुक्त सो.पुणे शहर यांनी सत्कार करुन त्यांचे उत्कृष्ट कामगिरी बाबत १०,०००/- रुपये बक्षीस व प्रशस्तीपत्रक देवुन गौरविण्यात आले बाबत...**

विश्रांतवाडी पोलीस स्टेशनचे हददीत बहीणीचे लग्नासाठी पैसे जमविणेसाठी दिनांक १३/०३/२०१९ रात्रौ ०२/३० वा.चे सुमारास काशीगंगा सोसा.धानोरी,पुणे येथील आय.सी. आय.सी.आय. बँकेचे ए.टी.एम. फोडण्याचा प्रयत्न करणारा इसम विशाल रमाकांत चाबुकस्वार,वय-२१ वर्षे,रा.मु.पो. निलंगा, शिवाजीनगर, ता.निलंगा, जि.लातुर यास धानोरी बीट मार्शल वरील सतर्क कर्मचारी पोलीस शिपाई ८१०२ वसुदेव खाडे व पोलीस शिपाई गणेश ७८१७ इथापे यांनी प्रसंगावधान राखून रात्रगस्त अधिकारी व कर्मचारी यांचे मदतीने त्यास त्याचेकडे मिळालेले पक्कड, स्क्रू-ड्रायव्हर, वायरकट करण्याची पक्कड अशा साधनांसह ताब्यात घेऊन त्याचे विरुद्व गुन्हा रजि नंबर ८१/२०१९ भादवि कलम ४५७,३८०, ५११,४२७ प्रमाणे फिर्याद नोंद करुन एटीएम फोडीचा मोठा गुन्हा होणेस प्रतिबंध केला आहे तपासात त्यास पकडलेनंतर त्याने १)शिवाजीनगर पो.टे.गु.र.नं.१७७/२०१९ भा द वि कलम ४५७,३८०,५११,४२७.२) खडकी पो.टे.गु.र.नं.९९/२०१९ भादवि कलम ४५७, ३८०,५११,४२७ असे गुन्हे केलेचे निष्पन्न झालेने मा.पोलीस आयुक्त शहर यांनी वरील उत्कष्ठ कामगिरी करणारे कर्मचारी खाडे व इथापे यांचा दिनांक २७/०३/२०१९ रोजी सत्कार करुन चांगली कामगिरी केलेबददल व भविष्यात सर्व कर्मचारी अधिकारी यांनी चांगली कामगिरी करावी या उदात्त हेतूने वरील दोन्ही कर्मचारी यांना प्रत्येकी १०,०००/- रुपये व जीएसटी असे बक्षीस मंजूर केले आहे.

सदरची कामगिरी मा.अप्पर पोलीस आयुक्त सो.पुर्व विभाग,श्री.सुनिल फुलारी सो. यांच्या मार्गदर्शनाखाली मा.पोलीस उप-आयुक्त,श्री.प्रसाद अक्ककानवरु, परिमंडळ-४ पुणे , मा.सहा.पोलीस आयुक्त,श्री.देविदास पाटील ,खडकी विभाग पुणे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड यांच्या मार्गदर्शना खाली पो.शि.वसुदेव खाडे, पो.शि.गणेश इथापे यांनी केली आहे.

सोबत- टीआरएम मिटींग मध्ये पोलीस कर्मचारी यांचे सत्कार झालेले फोटो पाठवित आहोत.

पोलीस कॉ.गणेश इथापे  विश्रांतवाडी पो.स्टेशन




पोलीस कॉ.वसुदेव खाडे विश्रांतवाडी पो.स्टेशन

